# बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक २६/०८/२०२६

---

दिनांक २६/०८/२०२६, रोजी ईद-ए-मिलाद सणानिमित्त मुस्लीम बांधवांकडून मोठया प्रमाणात मिरवणूक काढण्यात येतात.

दिनांक २६/०८/२०२६ रोजी ईद-ए-मिलाद निमित्त बृहन्मुंबई शहरात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या मार्गदर्शनानुसार मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बृहन्मुंबई यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

नागरिकांना ईद-ए-मिलाद सण सुरक्षितपणे व निर्विघ्नपणे साजरा करता यावा याकरीता मुंबई पोलीस दलाकडून उत्सवाचे काळात किमान **०८ अपर पोलीस आयुक्त, २९ पोलीस उप आयुक्त, ५६ सहायक पोलीस आयुक्त, १६१८ पोलीस अधिकारी, ८३२५ पोलीस अंमलदार** बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत. याशिवाय महत्वाच्या ठिकाणी एस.आर.पी.एफ. प्लाटून, जलद प्रतिसाद पथक (क्युआरटी), दंगल नियंत्रण पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट अशा चोख पोलीस बंदोबस्ताचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी, बृहन्मुंबई पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, गर्दीच्या ठिकाणी संयम दाखवून पोलीसांना सहकार्य करावे. बेवारस वस्तू आढळल्यास त्याबाबत तात्काळ माहिती  हेल्पलाईन १००/११२ येथे दयावी.

****